**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी नवीन निविदा प्रक्रिया राबविणे कामी होणाऱ्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

**मे. सविनय सादर,**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.०७/०८/२०२४ रोजी प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय नविन निविदा प्रक्रिया राबविणेकामी मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ नुसार सुक्ष्म पद्धतीने कार्यवाही होणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेसाठी नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी दि.०५/०९/२०२४ रोजी अंतीम निविदा प्रपत्र अहवाल सादर केलेनुसार तीन वर्षाकरिता व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देणेकामी होणाऱ्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.०६/०९/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

- त्याअनुषंगाने प्रभाग समिती क्रं.१ ते ५ निहाय खालील प्रमाणे खर्च होणार आहे.

| प्रभाग समिती | टन कचरा | प्रति महिना अंदाजे खर्च | प्रति महिना खर्च लाखात | लाखात प्रति वर्ष खर्च | कोटी मध्ये प्रति वर्ष | ३ वर्षाचा प्रकल्प खर्च (कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| Zone 1 | 114.64 | 6106756.66 | 61.07 | 732.81 | 7.33 | 21.98 |
| Zone 2 | 103.99 | 6084656.66 | 60.85 | 730.16 | 7.30 | 21.90 |
| Zone 3 | 107.02 | 6515122.9 | 65.15 | 781.81 | 7.82 | 23.45 |
| Zone 4 | 75.4 | 5157479.35 | 51.57 | 618.90 | 6.19 | 18.57 |
| Zone 5 | 73.82 | 5088625.92 | 50.89 | 610.64 | 6.11 | 18.32 |
| | 474.87 | 28952641.49 | 289.53 | 3474.32 | 34.74 | 104.23 |

वरील प्रमाणे प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय तांत्रिक सल्लागार यांनी सादर केलेल्या निविदा प्रपत्र प्रस्तावानुसार प्रभाग समिती निहाय आवश्यक साधनसाम्रुगी, वाहनचालक, मनुष्यबळ आणि त्यांचा तपशिल निहाय होणारा खर्च अंदाजे एकूण मासिक रु.२,८९,५२,६४१.४९/- इतका खर्च होणार असून वार्षिक खर्च रु.३४.७४ (कोटी) होणार आहे. तसेच पुढील प्रत्येक वर्षाकरीता होणाऱ्या रु.३४.७४ (कोटी) मध्ये ५ टक्के वाढ होणार असल्याचे अहवाल तांत्रिक सल्लागार यांनी दिलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन कचरा संकलन व वहन कामाकरीता तांत्रिक सल्लागार यांनी सादर केलेल्या निविदा प्रस्तावासाठी होणाऱ्या खर्चास सन २०२४-२५ मधील घनकचरा व्यवस्थापन लेखाशिर्षक अंतर्गत रु.२२ कोटी मधुन खर्च करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचा प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ५१४ **दि.** ०६ / ०९ /२०२४

वरील प्रमाणे प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय तांत्रिक सल्लागार यांनी दि.०५/०९/२०२४ रोजी अंतीम निविदा प्रपत्र अहवाल सादर केलेनुसार तीन वर्षाकरिता व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देणेकामी सादर केलेल्या निविदा प्रपत्र प्रस्तावानुसार प्रभाग समिती निहाय आवश्यक साधनसाम्रुगी, वाहनचालक, मनुष्यबळ आणि त्यांचा तपशिल निहाय होणारा खर्च अंदाजे एकूण मासिक रु.२,८९,५२,६४१.४९/- इतका खर्च होणार असून वार्षिक खर्च रु.३४.७४ (कोटी) होणार आहे. तसेच पुढील प्रत्येक वर्षाकरीता होणाऱ्या रु.३४.७४ (कोटी) मध्ये ५ टक्के वाढ होणार असल्याचे अहवाल तांत्रिक सल्लागार यांनी दिलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन कचरा संकलन व वहन कामाकरीता तांत्रिक सल्लागार यांनी सादर केलेल्या निविदा प्रस्तावासाठी होणाऱ्या खर्चास सन २०२४-२५ मधील घनकचरा व्यवस्थापन लेखाशिर्षक अंतर्गत रु.२२ कोटी मधुन खर्च करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचा प्रशासकिय ठराव घेणेस विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय तांत्रिक सल्लागार यांनी दि.०५/०९/२०२४ रोजी अंतीम निविदा प्रपत्र अहवाल सादर केलेनुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम तीन वर्षाकरिता व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देणेकामी सादर केलेल्या निविदा प्रपत्र प्रस्तावानुसार प्रभाग समिती निहाय आवश्यक साधनसामुग्री, वाहनचालक, मनुष्यबळ आणि त्यांचा तपशिल निहाय होणारा खर्च अंदाजे एकूण मासिक रु.२,८९,५२,६४१.४९/- इतका खर्च होणार असून वार्षिक रु.३४.७४ (कोटी) खर्च होणार आहे. तसेच पुढील प्रत्येक वर्षाकरीता वार्षिक होणाऱ्या खर्चामध्ये ५ टक्के वाढीव खर्चास तसेच आवश्यकते नुसार बदल करणे कामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेत येत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका